# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क.म.वि. 374
दिनांक 21/11/07

प्रति,
अध्यक्ष,
श्री तुकाराम ग्रामिण शिक्षण प्रसारक मंडळ,
द्वारा: श्री एम.डी. वोंडे पाटील शिक्षण महाविद्यालय
ब्राम्हणी ता. कळमेश्वर जि. नागपूर.

विषय:– नविन महाविद्यालयास प्रथम संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.
संदर्भ:– 1.शासन पत्र क.बी.एड.मान्यता–2006 / (543 / 06) / मशि -1 दि.19 एप्रिल 2007
2.एन.सी.टी.ई चे दि. 24–1–2007 चे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भित पत्रानुसार आपल्या सं...ा राज्य शासनाने व एन.सी.टी.ई. ने सत्र 2007–08 पासून बी.एड अभ्यासक्रमाचे नविन अध्यापक महाविद्यालय सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनुसार व निरंतर संलग्निकरणाकरिता गठित करण्यांत येणा–या स्थानिय चौकशी समितीच्या शिफारशीच्या अधिनस्थ म.वि. अधिनियम 1994 च्या कलम 14(7) अंतर्गत विद्वत परिषदेच्या वतीने सत्र 2007–08 करिता खालील अटींच्या अधिन राहून प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यास मा. कुलगुरुंनी मान्यता दिलेली आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा / अभ्यासक्रम | विद्यार्थी संख्येचे निकष |
|---|---|---|---|
| श्री तुकाराम ग्रामिण शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोली | श्री एम.डी. वोंडे पाटील शिक्षण महाविद्यालय ब्राम्हणी ता. कळमेश्वर जि. नागपूर. | शिक्षण विद्याशाखा बी.एड | 100 विद्यार्थी (मराठी माध्यम) |

उपरोक्त प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून देण्यांत आले आहे.

1.सदर महाविद्यालयास देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण फक्त 2007–08 या शैक्षणिक वर्षासाठी असून 2008–09 मधील निरंतर संलग्निकरण प्रदान करण्याबाबतची कार्यवाही स्थानिय चौकशी समितीच्या अहवालावर आणि विद्वत परिषदेच्या अंतीम निर्णयावर अवलंबून राहील. विद्वत परिषदेचा निर्णय महाविद्यालयावर बंधनकारक राहील. तसेच या पत्राद्वारे सत्र 2008–09 च्या संलग्निकरणासाठी कोणताही अधिकार संस्थेला प्राप्त होणार नाही.

2. सत्र 2008–09 करिता गठित स्थानिय चौकशी समितीने निरंतर संलग्निकरण प्रदान करण्याबाबत शिफारस केल्याशिवाय व त्यानुसार विद्यापीठाने महाविद्यालयास कळविल्याशिवाय सत्र 2008–09 करिता उपरोक्त महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येवू नये.

3. सत्र 2007–08 करिता गठित स्थानिय चौकशी समितीने आपल्या महाविद्यालयास भेट देवून सादर केलेल्या अहवालात दर्शविलेल्या त्रुटयांची पुर्तता तीन महिन्यांचे आंत करण्यांत यावी.

4. सदर महाविद्यालयास देण्यात आलेले संलग्निकरण सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग यांचेकडे महाविद्यालय कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याचे हमीपत्र सादर करण्याचे अटीवर देण्यांत येत आहे.

5. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या प्रवेश नियमानुसार करण्यांत यावे. तसेच संस्थेने महाविद्यालय आर्थिक दृष्टया चालविणे शक्य व्हावे यासाठी विद्यार्थ्यांकडून किती शुल्क आकारावे हे राज्याच्या शिक्षण शुल्क समितीकडून ठरवून घ्यावे.

कृपया कळावे.

आपला,
(स्वाक्षरी)
सहायक कुलसचिव (म.वि.),
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ,नागपूर.

प्रतिलिपी:–

1. संचालक उच्च शिक्षण विभाग, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत पुणे 411001.
2. सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर
3. संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
4. परिक्षा नियंत्रक,
5. वित्त व लेखा अधिकारी,
6. उपकुलसचिव, विद्या विभाग,
7. सहायक कुलसचिव, प...ा / लेखा / अंकेक्षण / गोपनिय / परिक्षा व चौकशी / व्या.परिक्षा / सांख्यिकी
8. प्रकाशन विभाग, विद्यापीठ ग्रंथालय इमारत
9. अधिक्षक शिक्षक मान्यता महाविद्यालयीन शाखा
10. संबंधित लिपीक शिक्षक मान्यता.
11. संबंधित लिपीक संलग्निकरण शाखा

(स्वाक्षरी)
अध्यक्ष
श्री तुकाराम ग्रामिण शिक्षण
प्रसारक मंडळ, गडचिरोली